ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २३ जानेवारी, १९५२ अंक ४

## विविध माहिती

**किल्लीची किंमत !**—इंग्लंडमधील बर्कशायर एज्युकेशन कमिटीच्या एका तिजोरीची किल्ली हरवली. त्या वेळीं तिजोरींत १२ पौंड शिल्लक होते. तिजोरींतून रक्कम काढण्यासाठी किल्लीची गरज होती. पण ती सांपडत नसल्यामुळें तिजोरी तशीच उघडण्याचें ठरलें. पण ह्या कामासाठी येणारा खर्च बारा पौंडांपेक्षा अधिक असल्यामुळें अखेर सदर १२ पौंड खर्चीं टाकण्यांत आले.

**सिनेमाच्या यंत्रांचें प्रदर्शन**—मुंबईला जागतिक चित्रपट प्रदर्शन भरणार आहे, त्यावेळीं सिनेमाविषयक यंत्रांचें एक मोठें प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. हें प्रदर्शन सिनमेटोग्राफिक इंपोर्टर्स असोसिएशनतर्फे भरविण्यांत येत आहे. बोलपट निर्माण करण्यापासून तो पडद्यावर दाखविण्यांत येईपर्यंत जितकें साहित्य वापरलें जातें तें सर्व प्रदर्शनांत ठेवण्यांत येणार आहे. त्याचा वापर कसा करण्यांत येतो तेंहि लोकांना दाखविण्यांत येईल. प्रदर्शन ता. २५ जानेवारीपासून १५ दिवस खुलें रहाणार आहे.

**मद्रास शहराचा पाणीपुरवठा**—मद्रास शहरांत सध्या पाण्याचा पुरवठा फार अपुरा झाला आहे. तो अंशतः सुधारण्यासाठी मद्रास कॉर्पोरेशननें ४ लाख रुपयांची एक योजना आखली आहे. नवीन तळीं खोदणें आणि खाजगी व सार्वजनिक विहिरींवर विजेचे पंप बसविणें, इत्यादि उपाययोजना करण्यांत येणार आहे. मद्रास सरकारनें ह्या योजनेला मान्यता दिली आहे.

**रेल्वेचे सुखसोयींनीं युक्त असलेले डबे**—आधुनिक सुखसोयींनीं युक्त असलेले दोन मोठे रेल्वेचे डबे भारत सरकारनें एका स्वित्झरलंडमधील कंपनीकडून मागविले होते; ते नुकतेच मुंबई बंदरांत आले आहेत. एकेका डब्यांत १०० उतारूंची सोय आहे. ह्यापैकीं एक डबा पहिल्या व दुसऱ्या वर्गाचा आहे; आणि दुसरा इंटर व तिसऱ्या वर्गाचा आहे. दोन्ही डब्यांत स्त्रियांसाठी वेगळी जागा ठेवण्यांत आली आहे.

**ऑस्ट्रेलिआंतील घोडे कमी होत चालले**—सैन्यांतील घोडदळाला लागणारे उत्तम प्रतीचे घोडे ऑस्ट्रेलिआंत पैदा होतात. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलिआंत फक्त ९,९९,००० घोडे होते. १९३९ पासून ऑस्ट्रेलिआ दरवर्षी ५० ते ६० हजार घोडे परदेशीं पाठवीत आहे. शेतीच्या यंत्रांना घोडे जुंपण्यांत वाढ झाल्यामुळें ही निर्यात होऊं लागली. ती अशींच चालू राहिल्यास १९६८ सालीं ऑस्ट्रेलिआंत एकहि घोडा रहाणार नाहीं, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**अमेरिकेंतील भाजीपाल्याची लागवड**—१९५२ सालच्या वसंत ऋतूंत अमेरिकेंत ६,०३,२४० एकर क्षेत्रांत भाजीपाल्याची लागवड करण्यांत यावी, असें शेतकी खात्यातर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. १९५१ सालीं जितक्या जमिनींतून भाजीपाला काढण्यांत आला, त्यापेक्षा हें क्षेत्र ९ टक्क्यानें अधिक आहे.

**१९,००० सहकारी शेतकी संस्था**—अमेरिकेंत एकूण १९,००० शेतकीविषयक सहकारी संस्था आहेत. त्यांची मालकी व नियंत्रण सुमारें ६०,००,००० अमेरिकन नागरिकांच्याकडे आहे. खेडेगांवीं रहाणाऱ्या अमेरिकन लोकांपैकीं चवथा हिस्सा लोकांना ह्या सहकारी संस्थांचा फायदा होत आहे.

**युद्धाच्या भीतीमुळें तांदुळाची सांठवण**—चीननें आक्रमण झाल्यास सयाममधील तांदुळाच्या शेतीला धोका उत्पन्न होणार आहे. हा संभाव्य धोका लक्षांत घेऊन सयामच्या सरकारनें ३,००,००० टन तांदुळाची सांठवण करण्याचें ठरविलें आहे. सयामकडे शेजारी राष्ट्रांकडून तांदुळासाठी सारख्या मागण्या येत आहेत. परंतु चालूं वर्षी ८,००,००० टनांपेक्षा अधिक तांदूळ निर्यात करावयाचा नाहीं, असें ठरविण्यांत आलें आहे.

**पाकिस्तानांत कोळशाचा तुटवडा**—पाकिस्तान सरकारनें द. आफ्रिकेला एक प्रतिनिधी-मंडळ पाठवून कोळसा मिळविण्याचे तांतडीचे प्रयत्न चालविले आहेत, असें समजतें. पाकिस्तान आणि भारत ह्यांच्यांत गेल्या फेब्रुआरींत झालेल्या कराराप्रमाणें जो कोळसा भारतानें पुरवावयाचा होता, त्यापैकीं ३,००,००० टनच पुरविल्यामुळें ही टंचाई उत्पन्न झाल्याचें समजतें. पूर्व-पाकिस्तान रेल्वेजवळ ९० दिवसांचा आणि प. पाकिस्तान रेल्वेजवळ ४५ दिवसांचाच सांठा आहे.

**कोलंबो योजनेची मदत**—कोलंबो योजनेप्रमाणें कॅनडानें भारताला गहूं देण्याचें कबूल केलें होतें. त्या गव्हापैकीं पहिला हप्ता व्हॅनकुवर बंदरांत बोटीवर चढविण्यांत येत आहे. गव्हाची किंमत सुमारें १,००,००,००० डॉलर्स इतकी आहे.

**दुधाच्या बाटल्या भरण्याचा कारखाना**—फ्रँकफर्ट (जर्मनी) येथें दुधाच्या बाटल्या भरण्याचा एक मोठा कारखाना उभारण्यांत आला आहे. हा कारखाना शेतकऱ्यांनीं सहकारी पद्धतीवर काढला असून त्याला मार्शल योजनेचेंहि आर्थिक साह्य मिळालें आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री अगदीं अद्यावत् पद्धतीची आहे. रोज २,४०,००० लिटर दूध शास्त्रीय पद्धतीनें शुद्ध करून बाटल्यांत भरण्यांत येईल.

## रिझर्व्ह बँकेचा १९५० चा वार्षिक अहवाल

### समाधानकारक प्रगति

रिझर्व्ह बँकेच्या १९५० च्या रिपोर्टांत एकूण सहा प्रकरणें असून त्यांत मुख्यतः बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या अंमलबजावणीची माहिती देण्यांत आलेली आहे. ह्या कायद्याचीं कलमें पाळण्याचे बाबतींत बँकांचें उत्कृष्ट सहकार्य होत असून, कलमें न पाळल्याबद्दल कोणत्याहि बँकेविरुद्ध इलाज करण्याची जरूरी रिझर्व्ह बँकेस पडली नाहीं. कित्येक बँकांत घटना व व्यवहार ह्याबाबत कायद्याचे पूर्वी दोष होते, ते हळूहळू नाहींसे होत चालले आहेत. १९४९ मध्यें रिझर्व्ह बँकेनें १६ बँका तपासल्या होत्या; १९५० मध्यें रिझर्व्ह बँकेनें ६५ बँकांची तपासणी केली. बंगालमधील चार शेड्यूल्ड बँकांच्या एकत्रीकरणामुळें तेथील बँकिंगचा भक्कमपणा वाढला आहे.

### वसूल भांडवल व रिझर्व्ह

१९४९ चे मानानें १९५० मध्यें हिंदी बँकांची परिस्थिति अधिक समाधानकारक होती. रिझर्व्ह बँकेकडून कर्जे घेण्याची जरूरी त्यांना कमी प्रमाणांत भासली. १९४९ अखेर बँकांचें एकूण वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची रक्कम ६२·६ कोटी रु. होती, ती १९५० अखेर ६७ कोटींवर गेली. एकूण बँकांपैकीं ७८·८% बँका बिगर–शेड्यूल्ड असल्या, तरी शेड्यूल्ड बँकांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह एकूण वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या ८८·४% होतें. बँकांच्या रिझर्व्हजमध्यें कांहीं सुधारणा झाली असली, तरी शेड्यूल्ड बँकांच्या मानानें बिगर–शेड्यूल्ड बँकांचे रिझर्व्ह, वसूल भांडवलाच्या तुलनेनें, अत्यल्प आहेत. शेड्यूल्ड बँकांत तें प्रमाण ७४%, तर बिगर–शेड्यूल्ड बँकांत ३३% आहे.

### ठेवींत वाढ

१९४८ व १९४९ ह्या वर्षी बँकांकडील ठेवी घटत गेल्या, परंतु १९५० सालीं ठेवींत २९ कोटी रुपयांची वाढ झाली. भारताच्या परराष्ट्रीय येण्या–देण्यांत अनुकूल परिस्थिति निर्माण होऊन त्यांत वाढावा उरला, त्याचा हा मुख्यतः परिणाम आहे. शेड्यूल्ड बँकांच्या गुंतवणुकींत १४ कोटींची भर पडून ती ४१६ कोटी रु. झाली. त्यापैकीं ३६६ कोटी रु. सरकारी रोख्यांत होते.

### कर्जांची छाननी

शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें ४११ कोटी रुपयांवरून ४४५ कोटी रुपयांवर गेलीं. ज्या बँकांनीं दिलेलीं कर्जें त्यांच्या ठेवींच्या ६०% पेक्षां ज्यास्त होतीं, अशा बँकांना कर्जांचें प्रमाण उतरविण्याविषयीं सूचना रिझर्व्ह बँकेनें केली. शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांपैकीं ५०% व्यापारासाठीं व ३०% कारखानदारीसाठीं होतीं. एकूण कर्जांपैकीं ४५% कर्जांस मालाचें तारण होतें व ४१% कर्जांस सरकारी व ट्रस्टी रोखे, शेअर्स, मालमत्ता, सोनें, इत्यादींचें तारण होतें.

### उत्पन्न वाढलें, पण खर्च ज्यास्त वाढला

बँकांचें उत्पन्न ३० लक्ष रुपयांनीं वाढून तें २९ कोटी रुपये झालें; पण खर्चहि वाढून अखेर निव्वळ नफा १९४९ मध्यें ७·९ कोटी रुपये होता, तो १९५० मध्यें ६·६ कोटी रुपयांवर आला. परंतु निव्वळ नफ्यापैकीं ३७% रक्कम डिव्हिडंड म्हणून वाटण्यांत आली. १९४९ मध्यें तें प्रमाण ३०% होतें.

## श्री. वर्दे ह्यांचा सन्मान

### लंडन बँकर्स इन्स्टिट्यूटचे फेलो



श्री. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम.

सुप्रसिद्ध शेअर व स्टॉक ब्रोकर श्री. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम., ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर, बॉम्बे प्रॉ. को. बँक लि. व चेअरमन, सारस्वत को. बँक लि., मुंबई ह्यांना इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स, लंडननें फेलो निवडल्याची बातमी आली आहे. श्री. वर्दे हे महाराष्ट्र बँकेचे, तिच्या प्रारंभापासून रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम क्षेत्राच्या लोकलबोर्डाचे ते सभासद होईपर्यंत, उपाध्यक्ष होते. भोर स्टेट बँक लि. चे ते अध्यक्ष होते. जॉ. स्टॉक व सहकारी, दोन्ही प्रकारच्या बँकिंगच्या क्षेत्रांतील त्यांचा अनुभव व त्यांची कामगिरी सुपरिचितच आहे. ह्या नव्या सन्मानाबद्दल आम्हीं श्री. वर्दे ह्यांचें अभिनंदन करतों.

महाराष्ट्र बँकेशी संबंधित असलेले, श्री. वर्दे हे लंडन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सचे दुसरे फेलो आहेत. बँकेचे मॅनेजर, श्री. चिं. वि. जोग ह्यांची फेलो म्हणून निवड सहा महिन्यांपूर्वीच झाली, हें वाचकांस माहीत आहेच.

### हिंदी बँकांच्या कचेऱ्या

बँकांच्या कचेऱ्यांची संख्या १९४७ पासून उतरत चालली आहे. तथापि, १९५० मध्यें फक्त ८८ कचेऱ्या कमी झाल्या. युद्धकाळांत भरमसाट उघडलेल्या कचेऱ्यांपैकीं तोट्यांत आलेल्या कचेऱ्या बंद होणें इष्टच आहे. नव्या शाखा उघडतांना बँका सावधगिरी बाळगीत आहेत. बँकांच्या कचेऱ्यांपैकीं बहुसंख्य कचेऱ्या मोठ्या शहरांतून केंद्रित झाल्या आहेत. प्रत्येक ७०,००० वस्तीस एक बँक कचेरी, असें प्रमाण पडतें. २,१९६ कचेऱ्या ५० हजार वस्तीवरील फक्त १७५ शहरांत गर्दी करून आहेत, तर ५० हजाराचे खालील वस्तीच्या गांवांपैकीं १,३७९ ठिकाणीं २,६८१ कचेऱ्या आहेत.

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

वरील बँकेस १९५१ वर्षी २,३९,६५० रु. नफा झाला. रोख्यांच्या विक्रींत आलेला ७७,९२४ रु. तोटा लिहून टाकून व १२,००० रु. ची नोकरवर्गासाठी बोनसची तरतूद करून हा नफा काढण्यांत आला आहे. त्यांत मागील शिल्लक नफा (५३,१९९ रु.) मिळविल्यावर नफा वाटणीस २,९२,८४९ रु. येतात. त्यांतून १,१०,००० रु. कराची तरतूद करावी, ४८ हजार रु. रिझर्व्ह फंडांत टाकावे, ५% डिव्हिडंडसाठी ८०,००० रु. खर्च करावे व ५४,८४९ रु. शिल्लक नफा १९५२ च्या हिशेबांत ओढण्यांत यावा, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर अखेरच्या सहामाहींत ६२·३ लक्ष रु. नफा झाला. १६% डिव्हिडंड कायम राखण्यांत आलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २३ जानेवारी, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिराकूड योजना: सरकारी खुलासा

हिराकूड योजनेपैकीं कांहीं भाग अर्धवट स्थितींत सोडून देण्याचा सरकारचा विचार आहे अशी वार्ता मध्यंतरी प्रसिद्ध झाली होती. परंतु आतां भारतीय सरकारनें पत्रक काढून ती खरी नसल्याचें जाहीर केलें आहे. वरील वार्तेचा उल्लेख करून सरकारी पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, वरील योजनेचा कोणताहि भाग तांत्रिक दृष्ट्या सदोष म्हणून रद्द करण्यांत आलेला नाहीं. अर्थातच खर्च फुकट गेल्याचें म्हणणें चुकीचें आहे. सरकारजवळ पैशाची टंचाई असल्यामुळें योजनेपैकीं कोणते भाग आधीं पूर्ण करावे आणि कोणते मागाहून हातीं घ्यावे ह्यासंबंधीं पुनर्घटना करण्यांत आली आहे इतकेंच. पुरावर नियंत्रण राखणें आणि शेतीस पाणीपुरवठा करणें ह्या उपाययोजना आधीं पार पाडण्याचें ठरविलें आहे. विजेची निर्मिति मागाहून करण्यांत येणार आहे. मूळच्या योजनेप्रमाणें १९५३ सालीं वीज-निर्मिति सुरू होणार होती. परंतु ती पुरी करावयाची म्हटलें तर पाणी-पुरवठ्याच्या व पूर-नियंत्रणाच्या योजनांना पैसा कमी पडला असता. म्हणून फक्त वीज-पुरवठ्यासाठीं बांधावयाचें दुय्यम धरण पुढें ढकलण्यांत आलें आणि अन्नधान्याच्या उत्पादनाला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य धरणाचें काम आधीं हातीं घेण्याचें ठरविण्यांत आलें. देशाची अन्नधान्याची सध्याची परिस्थिति लक्षांत घेतां वीज-निर्मिति थोडी लांबली तरी चालण्यासारखें आहे. ह्या दुसऱ्या धरणावर एक कोटी रुपये खर्च झालेला आहे. मुख्य धरण पूर्ण झाल्यावर व पैसे हातीं आल्यावर त्याचें काम पुढें चालू करण्यांत येणार आहे.

धरणाच्या खर्चाच्या अंदाजाची फेरतपासणी करावी लागली आहे. मूळ अंदाज ४७·८ कोटी रुपयांचा होता. नवीन अंदाज ८९ कोटी रुपयांचा आहे. अंदाजी खर्चांत झालेल्या वाढीचीं दोन मुख्य कारणें आहेत. एक तर योजनेचा विस्तार वाढविण्यांत आला आहे. मूळ योजनेप्रमाणें १०·९५ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा होणार होता. दुरुस्त योजनेप्रमाणें तो १९·३ लाख एकर जमिनीला होईल. मूळ योजनेचा खर्च १९४६ सालीं काढण्यांत आला होता. त्यानंतर रुपयाचें अवमूल्यन झालें आणि किंमतीहि वाढल्या; त्यामुळें खर्चाचा फेरविचार करावा लागला. योजनेचे दोन भाग आहेत. विजेची निर्मिति करणारें आणि संबळपूर जिल्ह्यास पाणीपुरवठा करणारें धरण हें मुख्य धरण आहे. तें पूर्ण झाल्यावर एकूण १९·३ लाख एकर जमिनीला पाणी-पुरवठा होईल व खालील प्रदेशाचें पुरापासून संरक्षण होईल. वीज निर्मिति ८५,००० किलोवॅट होईल. योजनेच्या ह्या भागाला ६८ कोटी रुपये लागतील. पूरक धरण पुरें झाल्यावर एकूण २,००,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. नदींत वाहतूक चालू करण्यासाठीं जें धरण बांधावयाचें होतें त्यावर अजून कांहींहि खर्च झालेला नाहीं. तो नंतर योग्यवेळीं करण्यांत येणार आहे. योजनेंतील दोन पूल बांधण्यांत आले आहेत. त्यापैकीं एक महानदीवर आहे. त्याला २५ कमानी असून प्रत्येक कमान १०८ फूट लांबीची आहे. दुसरा पूल १५० फूट लांबीच्या दोन कमानींचा बांधण्यांत आला आहे. हे दोन पूल बांधल्याशिवाय नदीवरून वाहतुक चालू करणें शक्य होणार नाहीं आणि नदीच्या उजव्या किनाऱ्यावरील बांधकामांत अडचणी निर्माण होतील. अशा परिस्थितींत पुलांचा खर्च जरूरच होता. दोन पुलांपैकीं मोठा पूल मुंबई व कलकत्ता जोडणाऱ्या नं. ६ च्या राजमार्गावर आहे.

पैशाची टंचाई लक्षांत घेऊन, सरकारनें हिराकूड योजनेपैकीं वीज निर्मितीचा भाग लांबणीवर टाकला आहे, हें योग्यच झालें आहे. योग्य वेळीं, फार उशीर होण्यापूर्वींच, हा निर्णय सरकारनें घेतला असल्यामुळें पैशाचा संभाव्य अपव्यय टळला आहे आणि नुकसान मर्यादित झालें आहे. योजनांच्या आकाराचा व त्यावरील खर्चाचा उपलब्ध पैशाशीं मेळ घालणें इष्ट आहे, आणि तातडीच्या गोष्टीच आधीं केल्या पाहिजेत, हें उघड आह. हिराकूड योजने-प्रमाणें इतराहि कांहीं योजनांत काटकसरीस वाव आहे काय, आणि त्या योजनांचा उपयुक्ततेच्या दृष्टीनें फेरविचार करून नवा अनुक्रम लावतां येईल काय, ह्याची पहाणी सरकारनें केली तर ती आजच्या बिकट आर्थिक परिस्थितींत अत्यंत उपकारक ठरेल.

## अरब राष्ट्रांच्या भवितव्याची दिशा

दुसरें महायुद्ध संपल्यापासून जीं पांच वर्षें गेलीं तीं भूमध्य समुद्राच्या लगतच्या अरबी राष्ट्रांतून फार धामधुमीचीं अशीं गेलीं. राजकीय खून, राज्यक्रांत्या आणि जनतेचा असंतोष हीं सामान्य लक्षणें ह्या कालांत अरबी राष्ट्रांतून दिसून येतात. परंतु हीं बाह्य लक्षणें झालीं. सर्वच अरब राष्ट्रें एका अस्वस्थ अवस्थेंतून जात आहेत. जुनी समाजरचनाच ढांसळत आहे. राजकारण, आर्थिक घडी, धर्म, शिक्षण, समाजांतील वर्गांचे एकमेकांशीं असलेले संबंध, स्त्रियांचें सामाजिक स्थान, इत्यादि अनेक बाबतींत उलथापालथ चालू आहे. १९ व्या शतकांत अल्जीरिआ, एडन, ट्युनिशिआ, इजिप्त, मोरोक्को व लिबिआ हीं राष्ट्रें प. युरोपमधील राष्ट्रांच्या सत्तेखालीं गेलीं. पहिल्या महायुद्धानंतर त्यांतील कांहीं जुन्या राष्ट्रसंघानें संरक्षित प्रदेश म्हणून प. युरोपिअन राष्ट्रांच्या हवालीं केलीं. वास्तविक सर्व अरब राष्ट्रें मिळून एक आर्थिक व राजकीय गट असण्यासारखी परिस्थिति आहे. पण उलट ह्या गटाचे तुकडे करण्यांत येऊन त्यांच्या दरम्यान जकातीच्या भिंती उभारल्या गेल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र पॅलेस्टाइनची निर्मिति झाली. पॅलेस्टाइनचें महत्त्व अरब राष्ट्रांना फार वाटतें; आणि तें केवळ धार्मिक आणि भावनात्मक आहे असेंही नाहीं. राजकीय आणि लष्करी दृष्टीनेंहि त्यांना पॅलेस्टाइन महत्त्वाचें वाटतें. कारण आशियांतील २०,००,००० अरब लोक आणि आफ्रिकेंतील त्यांचे ४,००,००,००० भाईबंद ह्यांना जोडणारा तेवढाच एक जमिनीवरील दुवा आहे.

ह्या अरबी जगांत पाश्चात्य पद्धतीची सुधारणा घडून येत आहे. सर्वच राष्ट्रें सारख्या वेगानें प्रगति करीत आहेत असें नाहीं.

इजिप्त आणि लेबॅनॉन ह्या राष्ट्रांत फार मोठा बदल घडून आला आहे. मोरोक्को आणि ट्यूनिशिआपेक्षा इराक आणि इजिप्तमध्यें पाश्चिमात्यांची सुधारणा अधिक वेगानें पुढें सरसावत आहे. उदाहरणार्थ, शिक्षणाची गोष्ट. लेबॅनॉनमध्यें शिक्षण अतिशय मागासलेल्या स्थितींत होतें. त्याच राष्ट्रांत आतां शाळेंत जाण्यास योग्य वय असणाऱ्या मुलांपैकीं ७५ टक्के मुलें शाळेंत जातात. इजिप्त आणि सिरिआमध्यें ५० टक्के जातात. ह्याशिवाय हजारों अरब विद्यार्थी परदेशांतील विद्यापीठांतून शिकून स्वदेशीं येत आहेत. शेंकडो पाश्चिमात्य पुस्तकांची अरबी भाषेंत भाषांतरेंहि झालेलीं आहेत. शिकणाऱ्या स्त्रियांची संख्या पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक झाली आहे. सीरिआमध्यें स्त्रियांना मतदानाचा हक्कहि मिळाला आहे; इजिप्त व लेबॅनॉनमध्येंहि लवकरच मिळेल असें दिसत आहे. आर्थिक आघाडीवरहि अशीच प्रगति चालू आहे. इजिप्त व इराकमध्यें पाणी–पुरवठ्याच्या मोठ्या योजना पूर्ण करण्यांत आल्या आहेत. शेतीच्या पद्धतींत सुधारणा करण्यांत आली आहे आणि त्यामुळें शेतीच्या मालाचें उत्पादन वाढलेंहि आहे. आधुनिक पद्धतीचे उद्योगधंदे अरब राष्ट्रांत १९३० च्या सुमारास सुरू झाले. आज इजिप्तमध्यें ६,५०,००० कामगार उद्योगधंद्यांत गुंतलेले आहेत. २० वर्षांपूर्वींच्या मानानें अरब राष्ट्रांत वहातुकीचीहि बरीच प्रगति झाली आहे, तथापि ह्या प्रगतीला विरोध करणारे पुराणमताभिमानीहि आहेत. उलटपक्षीहि ह्या सुधारणा अपुऱ्या आहेत असें समजणारे प्रागतिकही आहेत. अखेर परिणाम असा झाला आहे कीं, कुचंबणा आणि धुमसता असंतोष ह्या रोगांनीं अरबी जगाला पछाडलेलें आहे. पाश्चिमात्य सुधारणाबरोबर त्याच पद्धतीचा राष्ट्रवादहि अरब राष्ट्रांत पसरूं लागला आहे. कुटुंबनिष्ठा, जमातविषयक निष्ठा अगर धर्मनिष्ठा ह्यांचें प्राबल्य मोडून राज्यनिष्ठेवर नवीन समाजरचना उभारण्याचे प्रयत्न होत आहेत. ह्या राष्ट्रवादाला ब्रिटन आणि फ्रान्स ह्यांच्याकडून विरोध होत आहे; शिवाय अंतर्गत विरोधालाहि त्याला तोंड द्यावें लागत आहे. अरब राष्ट्रांचें आर्थिक, राजकीय व लष्करी महत्त्व स्पष्टच आहे. पण ह्याहिपेक्षा त्या राष्ट्रांतील सामान्य जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याचे प्रयत्न होणें जरूर आहे. त्या प्रयत्नांवरच अरब राष्ट्रांचें भवितव्य अवलंबून आहे.

---

### कॅन्सरच्या रोगाचीं वैशिष्ट्यें

"कॅन्सर रोगावर यशस्वी रीतीनें इलाज करतां येतो, आणि रोगाचें निदान लवकर झालें, तर तो पूर्णपणें बराहि होऊं शकतो. कॅन्सरवरील उपचाराची ठराविक अशी पद्धत अद्याप निघालेली नाहीं. परंतु योग्य वेळीं उपचार झाला तर मृत्यूचें प्रमाण कमी होऊं शकतें. क्षयासारखा कॅन्सर हा रोग सहवासानें दुसऱ्यास होण्याची भीति नसते. परंतु क्षय फक्त एकाच कारणानें होऊं शकतो, तर कॅन्सरचें मूळ शेंकडो कारणांत (कारखान्यांत वापरण्यांत येणारीं कांहीं रसायनें, तंबाकू, दीर्घकाळ सूर्याचा उजेड, इ.) आढळतें. दुसरी वाईट गोष्ट म्हणजे कॅन्सर शरीराच्या कोणत्याहि भागास होतो; कोणत्याहि वयाच्या माणसास तो होतो. अमेरिकेंतील प्रत्येक नऊ मृत्यूंपैकी एका तरी मृत्यूस कॅन्सरचा रोग कारण असतो. भारतांत हें प्रमाण बरेंच कमी आहे, कारण येथील माणसांचें आयुर्मानच फार थोडें आहे."—मुंबई येथील इंडियन कॅन्सर रिसर्च केंद्रांत सध्या काम करीत असलेले अमेरिकन कॅन्सरतज्ज्ञ, डॉ. ई. व्ही. कौड्री.

### "बँकांकडे अगदीं जरूरीखेरीज कर्जे मागूं नका"

#### व्यापारीवर्गास विनंति व इशारा

लंडन क्लिअरिंग बँकर्सच्या कमिटीचे अध्यक्ष, लॉर्ड बाल्फर व उपाध्यक्ष मि. ए. डब्ल्यू. ट्यूक ह्यांनीं लंडन येथील एका वृत्तपत्रांत एक पत्र प्रसिद्ध करून, जरूरीच्या कारणाखेरीज कर्ज न मागण्याची विनंति व्यापारीवर्गाला केली आहे. बँकेचे पतीचे व्यवहार आखडते घेण्याचें सरकारचें धोरण आहे, तें यशस्वी करण्यासाठीं बँकांनीं अधिक दक्षता बाळगली पाहिजे व बँका त्याबाबत कसूर करणार नाहींत, असें त्यांनीं वरील पत्रांत म्हटलें आहे. आवश्यक कारणासाठीं मागितलेलें कर्ज कोणतें, ह्याचा मात्र खुलासा करण्यांत आलेला नाहीं; संदिग्ध भाषेंत त्यांनीं शब्दांचें अवडंबर फक्त मांडलेलें आहे. ते लिहितात :— "सर्व व्यापारी वर्गाच्या सहकार्याची आवश्यकता येथें आहे. प्रत्येक धंदा व प्रत्येक व्यक्ती ह्यास आम्हीं स्पष्ट बजावूं इच्छितों कीं कर्जाचे अर्ज जास्त जास्त कडकपणें तपासले जातील आणि बँकांचीं कर्जें अधिकाधिक महाग पडत जातील. सर्व समाजानेंच बँकांना ह्या कामीं मदत केली पाहिजे. कर्जाची उद्देशांची छाननी लोकांनीं कसोशीनें करून जरूर नसलेलें कर्ज मागतांच कामा नये." ह्या पत्रावर टीका करतांना मँचेस्टर गार्डिअन साप्ताहिक म्हणतें, "गंभीर इशारा ह्या दृष्टीनें हें पत्र ठीक आहे. परंतु विनंत्या आणि बजावण्या ह्या प्रत्यक्ष कृतीची जागा घेऊं शकणार नाहींत."

---

**सयामकडून तांदूळ मिळणार**—सयामकडून तांदूळ मिळविण्यासाठीं भारतीय सरकारनें बोलणीं चालू केलीं आहेत. भारतानें ४,००,००० टन तांदूळ मिळण्याची मागणी केली आहे. त्यापैकीं ३,००,००० टन तरी मिळेल असें म्हणतात. अगदीं गरजच पडली तर आणखीहि थोडा तांदूळ मिळण्याची शक्यता आहे.

**पाकिस्तानांत खताचा कारखाना**—पाकिस्तान सरकारनें खताचा एक मोठा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्याला ४ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्याचे प्राथमिक नकाशे काढण्याचें काम दोन ब्रिटिश कंपन्यांकडे सोंपविण्यांत आलें आहे.

**वनस्पति तुपाचा कारखाना**—पाकिस्तानमधील भावलपूर संस्थानांत युनिलिव्हर लि. ह्या ब्रिटिश कारखान्याच्या मदतीनें वनस्पति तुपाचा तिसरा मोठा कारखाना नुकताच उघडण्यांत आला. त्यासाठीं १·२ कोटी रुपयांचें भांडवल घालावें लागलें.

---

#### पौड येथील सहकारी परिषद

सर्वोदय केंद्रातर्फे मुळशी तालुक्यांतील कोऑपरेटिव्ह सोसायट्यांची परिषद पौड येथें रविवार ता. २० जानेवारी १९५२ रोजीं दुपारीं १ वाजतां भरली. परिषदेचें उद्घाटन मुंबई राज्याचे अर्थमंत्री ना. वैकुंठभाई मेहता यांचे हस्तें झालें.

#### दि इंडियन बँक लि., मद्रास

२ लक्ष रु. कॉंटिंजंट फंडांत टाकून, रोखे विक्रींत आलेला ४,७५,००० रु. तोटा लिहून टाकून आणि १,५६,००० रु. नोकरवर्गास बोनस देऊन वरील बँकेस १७,५८,७३५ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांनीं १२% डिव्हिडंड देण्यासाठीं ६,३६,००० रु. लागतील. सिंकिंग फंडांत ७,५०,००० रु. टाकण्यांत येतील.

# कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांचें पुण्यस्मरण

कै. प्रो. वामन गोविंद काळे यांचे निधनास २७ जानेवारी, १९५२ रोजीं सहा वर्षें पूर्ण होत असून त्यानिमित्त त्यांच्या स्मृतीस शब्दसुमनांजाली अर्पण करणें कर्तव्यच आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक परिस्थितीमध्यें आश्चर्यकारक व झपाट्यानें फरक होत गेला व त्याचा परिणाम देशाच्या राजकीय नि आर्थिक परिस्थितीवर झाला. सर्व राष्ट्रांमध्यें सलोखा, प्रेम व शांतता प्रस्थापित व्हावी या हेतूनें जागतिक संघटना निर्माण झाली व त्याद्वारां वरील कार्यालेरीज अविकसित राष्ट्रांना आर्थिक व तांत्रिक सल्लामसलत देण्याची योजना तयार होऊन त्या दृष्टीनें कार्यास सुरवातहि झाली आहे.

कै. प्रो. वा. गो. काळे हे मान्यवर असे अर्थशास्त्रज्ञ होते, हें तर खरेंच. परंतु त्याबरोबर त्यांनीं देशांतील इतर निकडीच्या प्रश्नांबाबत विचार करून दुःस्थिति दूर करण्यासाठी आर्थिक पायावर नवीन व आवश्यक अशा व्यापार–उद्योगधंद्यांना उपयुक्त अशा संघटना निर्माण करून त्यांची जोपासना करण्याचे कामीं श्रम घेतले व त्या संस्थांची प्रगति पाहतां कै. प्रो. वा. गो. काळे यांच्या श्रमाचें चीज झाल्याचें अभिमानानें म्हणतां येतें.

कै. प्रो. वा. गो. काळे यांचें शैक्षणिक व आर्थिक जीवनांत महत्त्वाचें स्थान होतें. त्यांनीं आपल्या सार्वजनिक जीवनकार्यांत आपलें कार्यक्षेत्र सहकारी चळवळ हें केंद्रस्थान मानून आखलें होतें आणि त्या दृष्टीनें त्यांनीं या सहकारी चळवळींतील अनेक संस्थांत काम करून त्यांना योग्य असें मार्गदर्शन केलें व त्यांतील उणीवा दूर करण्याचा त्यांनीं अविरत प्रयत्न केला. हा प्रयत्न करीत असतां त्यांना कित्येक वेळां कठोर व अप्रिय असे निर्णय घ्यावे लागलें हें खरें आहे. परंतु ते निर्णय अंतीं हितावह असल्यानें त्यांच्या या निर्णयाबद्दल त्यांना अखेर धन्यवादच दिले गेले.

सहकारी चळवळीचीं गेलीं पांच वर्षें फार महत्त्वाचीं गेलीं. दुसरें महायुद्ध संपून देशास स्वराज्य प्राप्ती होऊन लोकाभिमुख अशी कारभार मंडळी अधिकारावर आली. सर्वांना जिव्हाळ्याचा व बहुजन समाजास आर्थिक अडचणींपासून दूर करण्यास 'सहकारी चळवळ' हा एकच मार्ग असल्याचें मान्य करून त्या दिशेनें प्रयत्न सुरू झाले. युद्धोत्तर योजना काय किंवा पंचवार्षिक योजना काय, या सर्वांत सहकारी चळवळीस फार मोठें स्थान दिलें गेलें व त्या दृष्टीनें सहकारी चळवळीची पुनर्घटना करण्यांत आली. आपल्या मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची पुनर्घटना झाली व मोठी आर्थिक जबाबदारी सहकारी चळवळीनें आपण होऊन घेतली. देशांतील आर्थिक परिस्थितींत इतक्या झपाट्यानें फरक झाला व सहकारी चळवळीचें स्वरूप इतकें बदललें कीं, आमच्यांतील विचारवंतांना असा विचार पडतो कीं ही चळवळ आतां सहकारी आहे कीं सरकारी आहे? मात्र असें म्हणत असतां आपले निर्णय चूक ठरले असून आतां ते बदलणें जरूर आहे, असें निर्भीडपणें न म्हणतां अनेक संस्थांमार्फत व परिषदांमार्फत सरकारी मदतीची व नियंत्रणाची मागणी करतात व सरकारी अधिकारी त्यांच्या निर्णयाचा स्वीकार करतात! अशा कार्यकर्त्यांनीं कै. प्रो. वा. गो. काळे यांचेमधील निर्भीडपणा व स्पष्टवक्तेपणा या गुणांचा अवलंब करणें हितावह नाहीं काय?

कै. प्रो. वा. गो. काळे हे आपल्यामध्यें होते व त्यावेळीं त्यांचे-विषयीं सर्वांचें मनांत नितांत आदर असेच. परंतु प्रस्तुतचे अनेक गुंतागुंतीचे प्रश्नांचे वेळीं त्यांच्या व्यक्तित्वाची जाणीव त्यांचे सहकारी व शिष्य यांना होऊन त्यांचेविषयींचा आदर द्विगुणित होतो; आणि त्याचें कारण असें कीं त्यांनीं समतोल-पणानें व जबाबदारीनें सर्वांसच आपलें जवळ केलें. सहकारी चळवळीस पोषक असे जे गुण म्हणजे सहिष्णुता, प्रामाणिकपणा व दुसऱ्याचे मताविषयीं आदर यांचा त्यांनीं उत्तम परिपोष केला. केवळ दुसरा पदवीधर :नाहीं अगर आर्थिक दृष्ट्या कमी प्रतीचा आहे, म्हणून त्याचा त्यांनीं अव्हेर केला नाहीं. उलट, तात्त्विक मतभेद असले तरी अनादर न करतां त्यांस प्रोत्साहन देऊन कार्यविस्ताराकडे त्यांनीं जास्त महत्त्व दिलें.

कै. प्रो. वा. गो. काळे यांनीं आपल्या गुणानें व कार्यपद्धतीनें सहकारी चळवळींत काम करून मानाचें व आदराचें स्थान मिळविलें. त्या गुणांचें अनुकरण करणें हें आजचे परिस्थितींत आवश्यक आहे व तें प्रत्येकानें करावें अशी अपेक्षा व्यक्त करणें हें या प्रसंगीं योग्यच आहे.

य. दि. खोले.

---

### जिनांच्या चरित्रलेखनाचें काम इंग्रज ग्रंथकाराकडे

पाकिस्तानचे निर्माते, मि. जिना ह्यांचें अधिकृत चरित्र लिहिण्याचें काम पाकिस्तान सरकारनें हेक्टर बोलिथो ह्या इंग्रज ग्रंथकाराकडे सोपविलें आहे. हे ग्रंथकार कराचींत येऊन दाखल झाले आहेत.

---

### हिंदुस्तानी शॉर्टहँड व टायपरायटिंगबाबत शिफारशी

हिंदुस्तानी शॉर्टहँड व टाइपरायटिंग कमिटीनें हिंदुस्तानी शॉर्टहँड व टायपिंग ह्यांच्या चार पद्धतींचा पुरस्कार केला आहे: अशु लिपि, वर्धा प्रणालि, निष्काम प्रणालि व ऋषिप्रणालि. ह्या चारीपैकीं कोणती पद्धति अधिक चांगली, हें कमिटीनें सुचविलेलें नाहीं; चारीहि पद्धतींच्या वाढीस वाव आहे असें तिचें मत आहे. स्टँडर्ड हिंदी टाइपरायटरला ४६ बटणें असावीं व पोर्टेबलला ४२ बटणें असावीं अशी कमिटीची शिफारस आहे. हिंदी तारा पाठविण्याच्या पद्धतींविषयींहि कमिटीनें शिफारसी केल्या आहेत. ही कमिटी घटना समितीच्या अध्यक्षांनीं १९४८ सालीं श्री. कालेलकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन केलेली होती.

---

### सहकारी कायद्यांत दुरुस्ती

दि बॉंबे को. सोसायटीज ॲक्ट, १९२५ मध्यें दुरुस्ती करणारें एक बिल ७ जानेवारीच्या मुंबई सरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे. कंपन्या, बँका आणि फर्म्स ह्यांना सहकारी पतपेढ्यांचे भाग धारण करतां यावे आणि सरकारला सहकारी पतपेढ्यांचे भाग घेतां यावेत, भागीदारांना त्यांच्या भागाची किंमत परत मिळण्याची गॅरंटी सरकारला घेतां यावी किंवा त्यावरील डिव्हि-डंडची हमी घेतां यावी, ह्या दृष्टीनें ह्या दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत. कांहीं विशिष्ट सोसायट्यांच्या शेअर भांडवलाबाबत सरकारनें पत्करलेल्या आर्थिक जबाबदाऱ्यांचा सरकारच्या कन्सॉलिडेटेड फंडावर बोजा निर्माण करता यावा, ह्या दृष्टीनें बॉंबे चार्ज्ड एक्स्पेंडिचर ॲक्ट, १९५० मध्येंहि दुरुस्ती केली जाणार आहे.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें

न्यायमूर्ति रानडे-स्मृतिदिनानिमित्त श्री. घारपुरे ह्यांचें भाषण

प्रीतवर्षाप्रमाणें संग्रहालयाचे संस्थापक न्यायमूर्ति रानडे यांचा स्मृतिदिन संग्रहालयाच्या विद्यमानें दिनांक १८ जानेवारी १९५२ रोजीं कॉमनवेल्थ इमारतींतील शेती संग्रहालयाच्या दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं श्री. ज. स. करंदीकर होते. या प्रसंगीं संग्रहालयाचे क्यूरेटर श्री. मा. वि. घारपुरे यांनीं "फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन्" या लंडनमध्यें भरलेल्या प्रदर्शनांत काय पाहिलें यासंबंधीं भाषण केलें. त्यांनीं सांगितलें कीं, हें प्रदर्शन १८५१ मध्यें भरलेल्या प्रदर्शनाचा शतसांवत्सरिक उत्सव म्हणून भरविण्यांत आलें होतें. ब्रिटिश पार्लमेंटनें यासंबंधीं एक कायदा केला. या निमित्तानें सर्व इंग्लंडभर निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारचे उत्सव चालले होते. हें प्रदर्शन त्या महोत्सवाचें प्रमुख अंग होतें. हा उत्सव म्हणजे एक देशव्यापी व प्रचंड असा उद्योग होता व इंग्लंडमधील प्रत्येक नागरिकानें त्याबद्दल अभिमान बाळगावा इतकें त्याचें महत्त्व होतें. प्रदर्शन या दृष्टीनें त्यांत अभ्यास करण्यासारखें किती तरी होतें व जगांतील कांहीं देशांनीं याचा खास अभ्यास करण्यासाठीं आपले प्रतिनिधी इंग्लंडला मुद्दाम पाठविले होते. इंग्लंडहून परत येतांना श्री. घारपुरे यांनीं जें साहित्य बरोबर आणिलें आहे त्याचें एक लहानसें प्रदर्शनहि कॉमनवेल्थ इमारतींतील संग्रहालयाकडे असलेल्या जागेंत मांडण्यांत आलें होतें. सदर प्रदर्शन यापुढें दोन महिने उघडें राहणार आहे. व तें बुधवार सोडून दररोज दुपारीं ४ ते ६ या वेळीं उघडें राहील.

### न्यू सिटिझन बँकेचें गिरगांवांत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. नें आपल्या स्वतःचे स्वतंत्र सेफ डिपॉझिट व्हॉल्ट गिरगांव येथें चर्नी रोड स्टेशनजवळ उघडण्याचें निश्चित केलें आहे. सेफ डिपॉझिट व्हॉल्ट लॉकर्सचे सुविख्यात कारागीर, मेसर्स गोदरेज आणि बॉइस ह्या कंपनीकडून सेफ व्हॉल्टचे दरवाजे व लॉकर्स बसविण्यांत आले आहेत. हे व्हॉल्ट १ फेब्रुवारी, १९५२ पासून सुरू होईल, असें समजतें.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस मागील वर्षांचा शिलकी नफा धरून गेल्या वर्षी १,४३,९४,२२३ रु. नफा झाला. सबंध वर्षासाठी भागीदारांना १४% डिव्हिडंड मिळणार आहे. पुढील हिशेबांत १७,६५,६२८ रु. नफा ओढण्यांत येईल.

### अर्बन को. बँक लि. सांगली

बँकेच्या कार्यालयाचे इमारतीचे कामास सुरुवात झाली आहे. इमारतीची जागा शहरांतील मध्यवर्ती ठिकाणीं असून हमररस्त्यावर आहे. इमारतींत सेफ डिपॉझिट लॉकर्सचीहि सोय करणेंत आली असून हें बांधकाम ८।१० महिन्यांत पुरें होईल. इकडील भागांत अर्बन बँकांपैकी स्वतःच्या मालकीची मोठी अशी इमारत सांगली अर्बन को. बँकेचीच प्रथम होणार आहे.

### युनियन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेनें आपल्या रोख्यांची किंमत ताळेबंदांत धरली आहे, ती ३१-डिसेंबर, १९५१ रोजीच्या बाजारभावानें असणारी किंवा त्यापेक्षा कमीच, अशी धरली आहे. गेल्या वर्षांचा शिलकी नफा धरून बँकेस ११,०२,७३७ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांना ६¼% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी २,७५,००० रु. लागतील.


# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| मागीचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४२,९३,००० |

## १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**एक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## ऊंसाची राब आणि अल्कोहोलचा धंदा

### नासाडी थांबविण्याचें महत्त्व

( श्री. वामन वासुदेव वाघ, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई )

मुंबई सरकारच्या दारूबंदीच्या धोरणामुळें उंसाच्या राबेचा आज जो अक्षरशः नाश आपले येथें होत आहे त्याचा राष्ट्रीय दृष्टीनें विचार झाला पाहिजे. अल्कोहोलच्या धंद्याकरितां ऊंसाच्या राबेचा कच्चा माल म्हणून उपयोग केला जातो. परंतु अल्कोहोलचें उत्पादन आणि वांटणी यांवर अनेक सरकारी बंधनें घातलीं असल्यामुळें ही स्थिति निर्माण झाली आहे. ऊंसाच्या राबेचा सांठा, उपयोग, विक्री किंवा वांटणी या सर्वांवर पूर्ण नियंत्रण असून त्याबाबतच्या प्रत्येक बारीकसारीक व्यवहाराचाहि अत्यंत तपशिलवार हिशोब ठेवावा लागतो. पावसाच्या पाण्यामुळें खराब झालेली राब फेंकून द्यावयाची असल्यास, किंवा पुरेशा जागेच्या अभावीं ती व्यवस्थित न ठेवतां आल्यास किंवा ज्या टाकींत ती ठेवली जाते त्या टाकीच्या दुरुस्तीकरितां राब बाहेर काढावयाची असल्यास सरकारी परवानगी मिळण्यास बराच विलंब लागतो.

साखरकारखान्यांत जी एकंदर ऊंसाची राब तयार होते त्यापैकीं ६० टक्के भाग सरकारच्या उपयोगाकरितां राखून ठेवावा लागतो; परंतु यापैकीं किती राब सरकार केव्हां घेईल याची निश्चिती नसते. हा ६० टक्के भाग सरकारकरितां राखून ठेवावा लागत असल्यामुळें तो इतर कुणाला विकता येत नाहीं. सरकारला ही राब नको असली तर ऊंस गाळणीचा मोसम ज्यावेळीं सुरू होतो आणि प्रत्यहि आणखी राब तयार होऊं लागते त्यावेळीं साखरकारखान्यांना तसें कळविण्यांत येतें. अशा या सरकारी कारभारामुळें साखर कारखान्यांना किती गैरसोय व त्रास सहन करावा लागत असेल हें सांगण्यापेक्षां त्याची कल्पनाच करणें बरें. साखर तयार होत असतांना रोज मोठ्या प्रमाणावर तयार होणारी राब सांठवून ठेवण्याची व्यवस्था कारखान्यांना करावी लागते. राबेचा सांठा एकत्र करून ठेवण्याची व्यवस्था करणें हें कांहीं सोपें काम नव्हे, आणि बांधकामाचें साहित्य मिळणें आज कठीण झालें असल्यामुळें तें काम बरेंच अवघड होऊन बसलें आहे.

आतां दक्षिणेंत आपलेकडे ज्या साखरकारखान्यांच्या डिस्टिलरीज आहेत त्यांनाहि इतर कारखान्यांप्रमाणेंच त्रास सहन करावा लागतो. कारखान्यांत जो माल तयार होतो त्याचा सत्वर उठाव होत नाहीं, कारण त्याबाबत कितीतरी बंधनें घातलीं आहेत, त्यामुळें पैसा अडकून पडतो व कारखान्यांची आर्थिक ओढाताण होते.

इतर उद्योगधंद्यांना कच्चा माल म्हणून लागणाऱ्या कितीतरी वस्तू पॉवर अल्कोहोल पासून तयार करतां येतात. परंतु पॉवर अल्कोहोलवर डोईजड असे कर बसविले आहेत. प्रयोग करण्याकरितां थोडासा जरी पॉवर अल्कोहोल हवा असला तरी त्याकरितां सरकारी परवानगी लागते आणि त्याकरितां महिनोनुमहिने वाट पहावी लागते आणि करहि भरावा लागतो. अशा परिस्थितींत कुठलेंच काम धड होत नाहीं.

या महत्त्वाच्या आणि उपयुक्त धंद्याचा विकास करावयाचा असेल तर प्रयोगाकरितां, कर-माफ अल्कोहोल मिळाला पाहिजे. त्याचप्रमाणें, रसायनें व औषधें तयार करण्याकरितां तो हवा असला तरीहि त्यावर कर आकारला जाऊं नये; मात्र तें काम सरकारी देखरेखीखालीं व्हावें व देखरेखीकरितां होणारा खर्च सरकारनें सोसावा. अल्कोहोलपासून पिण्याचीं मद्यें आणि इतर वस्तू यांना भारताच्या आसपासच्या देशांतील बाजारपेठ असून त्यामुळें बरेंच परदेशी चलनहि मिळवितां येईल. या धंद्याच्या विकासाकरितां आणि स्थैर्याकरितां देशांत सर्वत्र एकसूत्री धोरण असणें आवश्यक आहे. भारत सरकारचे या बाबतीचे प्रयत्न कांहीं घटक राज्यांच्या दारूबंदीच्या धोरणामुळें अयशस्वी होत आहेत. मुंबई सरकारनें दारूबंदीचें धोरण अवलंबिल्यामुळें राबेसंबंधी १९४७ सालचा कायदा व त्यानुसार नियम करणें त्यांना आवश्यक झालें. या उद्योगधंद्यांतील लोकांबरोबर विचारविनिमय न करतां हें सर्व करण्यांत आलें. सरकारनें यासंबंधांत योग्य ती दुरुस्ती करावी आणि या धंद्याच्या विकासाला खीळ पडणार नाहीं अशा तऱ्हेनें त्यांची अंमलबजावणी व्हावी. आंतरराष्ट्रीय परिस्थिति बिघडल्यामुळें ज्यावेळीं पेट्रोल आणि इतर तेलें दुर्लभ होतील त्यावेळीं या तेलांच्या ऐवजीं पर्याय वस्तू म्हणून पॉवर अल्कोहोलचा उपयोग करतां येईल. एकट्या मुंबई राज्यांत आज ३५ हजार टनापेक्षां अधिक राबेची प्रतिवर्षी अक्षरशः नासाडी होत आहे. ही नासाडी थांबविणें आणि हा धंदा सुस्थिर करणें सर्वस्वी मुंबई सरकारच्या हातांत आहे. ( २४ व्या वार्षिक साधारण सभेंतील भाषण. )

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

### भारतांत आयात झालेली कची फिल्म

गेल्या कांहीं वर्षांत भारतांत आयात करण्यांत आलेल्या परदेशीय कच्च्या फिल्मची लांबी आणि तिची किंमत खालीं दिली आहे:—

| वर्ष | लांबी (फूट) | किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १९२८–२९ | १,०७,९२,३४१ | १९,८१,९११ |
| २९–३० | १,०२,४७,०५१ | १९,०६,३४१ |
| ३०–३१ | १,०१,७९,६९९ | १९,६०,४९५ |
| ३१–३२ | ८९,७९,८६२ | १७,१०,००० |
| ३२–३३ | ९५,०१,०२३ | १९,१०,०५१ |
| ३३–३४ | १,०८,२६,३६६ | २७,७६,४६२ |
| ३४–३५ | ९०,२६,७३१ | २४,८८,८१८ |
| ३५–३६ | ८८,२०,८०४ | २५,८०,४२१ |
| ३६–३७ | ९४,०७,८८८ | २४,८९,८८७ |
| ३७–३८ | २,२२,७८,३३८ | ३८,१४,७३८ |
| ३८–३९ | २,६०,३४,४७९ | ३७,६९,३०५ |
| ३९–४० | २,३८,११,६५४ | ५४,१८,८३५ |
| ४०–४१ | १,८३,६७,३०२ | ५९,४३,२५३ |
| ४१–४२ | १,७१,२२,१९४ | ५१,८८,८१८ |
| ४२–४३ | ६९,२३,६२४ | १८,०६,९६१ |
| ४३–४४ | १,१०,२१,०२७ | २८,५७,०९४ |
| ४४–४५ | १,१२,३०,५५९ | ३०,८३,४४८ |
| ४५–४६ | १,६१,८१,०३८ | ४५,९८,४९२ |
| ४६–४७ | १,५१,१५,२९२ | २४,५९,८२६ |
| ४७–४८ | १,५०,०८,३१७ | १९,९८,२८० |
| ४८–४९ | १,२३,९१,०६८ | ६१,५२,०४२ |
| ४९–५० | १,४६,३२,००० | ३८,१७,६१० |

### रशियाच्या दृष्टींतून १९५६

मॉस्को येथें 'न्यू टाइम्स' नांवाचें साप्ताहिक प्रसिद्ध होत असतें. ह्या साप्ताहिकाच्या १९५२ च्या पहिल्या अंकाच्या अर्ध्या भागांत १९५६ असें मुद्दामच छापण्यांत आलें आहे. १९५६ साली जगाची स्थिति कशी असेल तें ह्या भागांत सांगण्यांत आलें आहे; पण हें भविष्यकथन म्हणून मात्र केलेलें नाहीं. आर्थिक व राजकीय घडामोडींचें संभाव्य परिणाम, असें वरील वर्णनाचें स्वरूप आहे.

'आम्हांला हवी असलेली शांतता' ह्या शीर्षकाखालीं एक लेख लिहिण्यांत आलेला आहे. कांहीं दिवसांपूर्वी अमेरिकेमधील 'कोलिअर्स' ह्या मासिकांत 'आम्हांला नको असलेलें युद्ध' ह्या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला होता. ह्या लेखांत रशि-आचा पराभव होऊन तो अमेरिकेनें व्याप्त केल्याचें लिहिलें होतें. त्याला उत्तर म्हणून 'न्यू टाइम्स'नें वरील लेख छापला आहे, असें दिसतें. इतर लेखांचा सारांश असा आहे:— जगांतील लोकां-च्या दडपणामुळें १९५६ साली ॲटम बॉंबवर बंदी घालण्यांत आली आहे आणि ५ बड्या राष्ट्रांत, शांततेचा करार करण्यांत आला आहे. शीतयुद्धाचा शेवट झाल्यामुळें जगाला फार फायदा झाला आहे, पूर्व आणि पश्चिम ह्यांच्यांत पुन्हा व्यापार सुरू झाला आहे. शस्त्रास्त्रांच्या भारांत कपात करण्यांत आल्यानें जगांतील जनतेचें राहणीचें मान सुधारलें आहे. ब्रिटनच्या ईस्ट ॲंग्लिया भागांतील अणुबॉंबच्या विमानतळावरून शेवटचें अमेरिकन विमान परत गेलें आहे; त्यामुळें ब्रिटनमध्ये आनंदी-आनंद झाला आहे. ब्रिटिश सरकारनें करांचा बोजा कमी करून घरें बांधण्याचा व सार्वजनिक आरोग्याचा खूप मोठा कार्यक्रम हातीं घेतला आहे. युरोपांतून आणि आशिआंतून अमेरिकन लष्कर परत येऊं लागल्यामुळें अमेरिकेंत घबराट उडाली आहे. (हा लेख हॉवर्ड फास्ट या अमेरिकन लेखकानें लिहिला आहे.) अमेरिकेंतील फॅसिस्ट तेथें सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करीत आहेत व अमेरिकेंतील १८ बॅंकवाल्यांनीं आणि उद्योगपतींनीं आत्महत्या केल्या आहेत. त्याचबरोबर इतर कांहीं अमेरिकन उद्योगपतींनीं चीन, रशिआ आणि भारत ह्यांच्याबरोबर व्यापारी करार केले आहेत. हजारों अमेरिकन लोक रशिआ आणि चीन-मध्यें प्रवास करण्यासाठीं येत आहेत. पण जगाचे सर्वच प्रश्न सुटलेले नाहींत. अमेरिकेंत ॲटम बॉंबचे गुप्त कारखाने असल्याचें उघडकीस आलें आहे. जगभर भांडवलवाल्यांची कम्युनिझमविरुद्ध धडपड चालूच आहे. तथापि, एकंदरीनें पहातां, जगांत सुख-समृद्धि बरीच दिसून येत आहे.

भाटकळ बंदरांत नवें दीपगृह—भाटकळ बंदरांत सध्यां असलेल्या दीपगृहाच्या जागींच एक नवें दीपगृह बांधण्यांत येणार आहे. ह्या दीपगृहाला सुमारें ४ लाख रुपये खर्च येणार असून त्यामधील दिव्याचा मार्गदर्शक झोत किनाऱ्यापासून १५ मैलांपर्यंत दिसूं शकेल.

स्थापना ] पांढऱ्या कोडावर [ १९१६.
श्री. अंबाजी धोंडु मोरे पो. ता. वाडे जि. ठाणें लिहितात:— मी कोडाकरितां पुष्कळ औषधें केलीं पण गुण आला नाहीं. खरोखरच आपलेच प्रभावी औषधानें माझें मुलीचें संपूर्ण कोड नाहीसें झालें. अशीं शेकडों प्रशस्तिपत्रें व बक्षिसें मिळालीं. किं. रु. ५ प्रो. ख. १५ आणे. वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरूळपीर, जि. आकोला (वऱ्हाड)

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बॅंका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बॅंक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

ठेवी स्वीकारण्यांत येतात
ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.
पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७१४ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बॅंक लि.
( शिड्यूल्ड बॅंक )
प्रेसिडेन्सी बॅंक बिल्डिंग
पुणें २.
अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००
मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. वा. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. डी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.